भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये Rs. 100

रु. 100 ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA 0 FEB 2010 27 JAN 2010 CN 056595

अ. क्र. 5833 ... 6/2/2010 100/
खरेदीदाराचे नाव म. आयुक्त महानगरपालिका, नांदेड
कोणास आयुक्त, नावा. म. न. पा. नांदेड

Treasury Office, Nanded

नांदेड तालुका क्रिडा संकुल संयुक्त
प्रकल्पासाठी त्रिपक्षीय सामंजस्य करारनामा

१. श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी तर्फे सचिव,श्री.डी.पी.सावंत वय ४९ वर्ष धंदा समाजसेवा रा.शिवाजीनगर,नांदेड.

२. नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड. तर्फे उप-आयुक्त, श्री.रत्नाकर कांतराव वाघमारे, आणि

३. महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग.तर्फे जिल्हा क्रिडा अधिकारी ,नांदेड. श्री.गुलाब गोपाजी राठोड वय वर्ष धंदा नौकरी राहणार जिल्हा स्टेडीयम इमारत नांदेड.

कारणे त्रिपक्षीय संयुक्त करारनामा करण्यात येतो की,

ज्या अर्थी नांदेड शहरातील तत्कालीन सिडकोच्या अखत्यारीतील शेजार गट क्र.एन.एच.४ अंतर्गत खेळाचे मैदानाचे एकुण क्षेत्र २५२३२ चौ.मी.सिडकोने दिनांक ०२.०७.२००२ ला कराराने श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी,नांदेडला १० वर्षासाठी म्हणंज वर्ष ०१.०७.२०१२ पर्यंत भाडे कराराने दिला आहे. आणि ज्याअर्थी दिनांक हस्तांतरण लेखापत्रा व्दारे सिडको प्रशासनाने त्यांची सर्व मालमत्ता नांदेड वाघाळा

Indira Gandhi (Sr.) College ★ CIDCO, New Nanded. (M.S.) ★ Principal

Scanned with Oken Scanner

शहर महानगरपालिका यांना ०५.१०.२००१ रोजी हस्तांतरण केली ज्या अर्थी सिडकोच्या वर्ष सालच्या पर्यायाने उपरोक्त एन.एच.४ मधिल २५२३२ चौ.मी.भुखंडाची निर्विवाद मालकी उपरोक्त नांदेड वाघाळा शहर महानगर पालिकेची झालेली आहे.

ज्याअर्थी शासन निर्णय महाराष्ट्र क्रिडा धोरण २००१ नुसार नांदेड तालुका संकुल शासनाने मंजुर केले आहे.

ज्याअर्थी श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी.नांदेड.ने वर नमुद केल्याप्रमाणे सिडकोने त्यांना दिलेला एकूण २५२३२ चौमी.जागेवर तालुका क्रिडा संकुल बांधण्यासाठी ही जागा तालुका क्रिडा संकुल समिती .नांदेड यांना देण्याचा ठराव श्री.शारदा भवन एज्युकेशन सोसायटी,नांदेड यांनी दिनांक ११.०६.२००६ रोजी घेतलेला आहे.

ज्याअर्थी श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी.नांदेड त्यांचे पत्र दिनांक ३०.७.२००८ व्दारे सदरचा भुखंड तालुका क्रिडा संकुल समिती यांना देण्यासाठी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची अनुमती अपेक्षीत होती. ज्याअर्थी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सर्वसाधारण सभेने दि.२२.१.२००९ रोजी संमत केलेला ठराव क्र.११९ आणि दि.१८.८.२००९ रोजी संमत केलेला ठराव क्र.८० नुसार श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी, नांदेडने तालुका क्रिडा संकुल नांदेड साठी ज्या तारखे पासुन श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी, नांदेडला सिडको कडुन भुखंड मिळाला त्या तारखे पासुन ज्याची लिजची मुदत संपत असल्यामुळे एकुण ९९ वर्षा करीता वाढवुन देण्याचा ठराव घेतला आहे.त्या अर्थी उक्त जागेवर तालुका क्रिडा संकुल तर्फे क्रिडा संकुल बांधणे कामे जागेचे मुळ मालक नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे पहिले भाडेपट्टेदार श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी,नांदेड आणि उपरोक्त लिखीत महापालिकेचा ठरावानुसार मान्य करण्यात आलेले पोट भाडे (सबलिजी) यांच्यात खालील प्रमाणे त्रिपक्षीय करार ( TRIPARTY AGREEMENT ) रोजी करण्यात येत आहे.

## कराराच्या अटी व शर्ती

१. श्री.शारदा भवन एज्युकेशन सोसायटी,नांदेड. २.नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड. ३.जिल्हा क्रिडा अधिकारी, नांदेड यांच्यात हा त्रिपक्षीय करार आहे, व सर्व संबिधतांना बंधनकारक राहील.
२. सिडको मार्फत महापालिकेकडे उक्त भुखंड हस्तांतरीत झाल्यामुळे, महानगरपालिकेची सदर भुखंडावर मुळ मालकी मान्य करण्यात येत असुन श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी, नांदेड ही प्रथम भाडेपट्टेदार (Leasee) आणि तालुका क्रिडा संकुल समिती नांदेड ही भाडेपट्टेदार (Sub Leasee) म्हणुन मान्य करण्यात येत आहे.
३. सिडकोने श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी,नांदेड यांना रु.११००.०० वार्षीक या दराने भाडे आकारले आहे. त्यांचे भाडे आकारणी खालील प्रमाणे होईल.तालुका क्रिडा संकुल समिती ,नांदेड. यांनी वार्षीक रु.११००.०० भाडे श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी, नांदेडला द्यावे ते श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी, नांदेडने महानगरपालिकेकडे भरावे सदरचा करार या महानगरपालिकेने कोणतीही मुदत वाढ न दिल्यास सन २१०८ या तारखेस संपुष्टात येईल.
४. तालुका क्रिडा संकुल समिती मध्ये श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी. नांदेड यांचे दोन सदस्य (संस्था ठरवतील ते प्रत्येक) व नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका तर्फे आयुक्त किंवा त्यांचे प्रतिनिधी

Indira Gandhi (Sr.) College ★ Principal ★ CIDCO, New Nanded. (M.S.)

Scanned with Oken Scanner

म्हणुन संबधित विभागाचे उपआयुक्त आणि दुसरे सदस्य म्हणुन महापौर किंवा त्यांनी नामनिर्देशित केलेले एक सदस्य समाविष्ठ असतील.

५. तालुका क्रिडा संकुल उभारण्याचे काम हे तालुका क्रिडा समितीने शासनाच्या मंजुरीने करावयाचे असुन संकुल उभारण्यासाठी येणारा खर्च समिती मार्फत करावयाचा आहे.

६. सदर विकास प्रकल्पास बांधकामाचे नियम (Building Bye Laws, DC Rules) लागु असतील. त्याप्रमाणे संबधित विभागाचे मान्यता घेण्याचे जबाबदारी जिल्हा क्रिडा अधिकारी पार्टी क्र.३ यांची राहील.

७. तालुका क्रिडा संकुल नांदेड उभारणीची काम पुर्ण झाल्यानंतर त्याठिकाणी शासन निर्णयानुसार तालुका क्रिडा अधिकारी यांचे कार्यालय तसेच तालुका क्रिडा प्रशीक्षण केंद्रासाठी आवश्यक ती कार्यालये प्राधान्याने उघडण्यात येतील.

८. शासनाचे क्रिडा विभागा मार्फत तसेच महानगरपालिके मार्फत घेण्यात येणाऱ्या क्रिडा स्पर्धा/क्रिडा महोत्सव /सांस्कृतिक कार्यक्रम/प्रशीक्षण शिबीर व इत्यादीसाठी क्रिडा संकुलातील आवश्यक त्या सर्व सोयी सुविधा प्राधान्य क्रमाने विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात येतील.

९. कराराच्या अंमलबजावणीत कोणत्याही अडचणी उद्‌भवल्यास किंवा वाद निमार्ण झाला त्याची निराकरण करण्याची शक्ती जिल्हाधिकारी, नांदेड यांना राहतील व त्यांनी दिलेला निर्णय तिन्हीही पार्टीला बंधनकारक राहील.

१०. शहरातील इतर संस्थांना तसेच खेळाडुंना क्रिडा संकुलातील आवश्यक बाबीचा वापर क्रिडा विषयक बाबीसाठी करावयाचा असल्यास त्याचे आरक्षण हे तालुका क्रिडा संकुल समिती ( व श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी, नांदेड व नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड ) यांच्या समन्वयाने देण्यात येतील. तसेच इतर संस्थांना क्रिडा संकुलातील बाबी वापरासाठी देतांना त्यापोटी घ्यावयाचे शुल्क ठरविण्याचे अधिकार व मिळणाऱ्या उत्पन्नाचे लाभार्थी कोण व किती प्रामाणात राहतील याबाबत तिन्ही पक्ष समझोता करतील.

११. तालुका क्रिडा संकुलासाठी आवश्यक असलेला कर्मचारी वर्ग प्रशीक्षक सेवक नेमण्याची जबाबदारी तसेच त्यांचे दरमहा वेतन भत्ते मानधन अन्य सोयीसाठी येणारा खर्च तालुका क्रिडा संकुल नांदेडने करावयाचे आहे.सर्व कर्मचारी हे तालुका क्रिडा संकुलाचे सेवक म्हणुन समजले जातील. ते संस्थेचे सेवक म्हणुन समजले जाणार नाही.

१२. संकुलाचे कामकाज महाराष्ट्र शासनाने क्रिडा संचालनाच्या नियमानुसार तसेच महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार समितीच्या सदस्यांच्या सुचनेनुसार चालविण्यात येईल.

१३. संयुक्त प्रकल्पाच्या संबंधाने होणाऱ्या सर्व कायदेशीर बाबींचा कार्यवाहीची जबाबदारी तसेच या संदर्भात दाखल होणारे दावे खटले याबाबतची संपुर्ण जवाबदारी खर्चासह तालुका क्रिडा संकुलाची राहील.यासंबधी कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई शासन जवाबदार राहणार नाही.

१४. तालुका क्रिडा संकुल समिती हे क्रिडा संकुलाचे विकास कामे शासनाच्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे व शासन निर्णयानुसार करतील.शासनाने नमुद केलेल्या बाबी व्यतीरीक्त इतर बाबी उभारावयाच्या असल्यास श्री.शारदा भवन एज्युकेशन सोसायटी, नांदेड व नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका.नांदेड आणि तालुका क्रिडा संकूल समिती यांच्या संयुक्त विद्यमाने व मान्यतेने उभारण्यात येईल. मात्र यासाठी शासन अनुदाना व्यतिरीक्त लागणारा उर्वरीत निधी हा स्थानिक पातळीवर संयुक्तपणे उभारुन प्रकल्प पुर्ण

Indira Gandhi (Sr.) College
Principal
CIDCO, New Nanded. (M.S.)

Scanned with Oken Scanner

करारात नमूद नागरिक अथवा इत्यादी जे असलेले ऐवजी देण्याची तयारी दर्शविल्यास त्यासंबंधी सदर तालुका क्रिडा संकुल समितीत का संबंधितांच्या प्रचलित शासन नियमानुसार घेता येईल. करार कालावधी दरम्यान होणारी नैसर्गिक आपत्तीमुळे चोरी किंवा क्रिडा संकुल इमारत असतांना किंवा वापरतेवेळी असतांना काही अपघात होवून नुकसान झाल्यास त्याच्या दुरुस्तीची संबंधी जबाबदारी तालुका क्रिडा संकुल नांदेड यांच्यावर राहील

१५ क्रिडा संकुल समिती तर्फे बांधण्यात येणाऱ्या कोणत्याही इमारतीच्या भागास मैदानास कोणत्याही व्यक्तीचे नाव (जीवित अथवा मृत) नामकरण करता येणार नाही

| | | |
|---|---|---|
| १ सचिव | २ जिल्हा क्रिडा अधिकारी | ३ उप-आयुक्त |
| श्री डी.पी.सावंत | श्री.गुलाब गोपाजी राठोड | श्री.रत्नाकर कांतराव वाघमारे |
| श्री शारदा भवन एज्युकेशन | तथा सहअध्यक्ष तालुका | नांदेड वाघाळा शहर महानगर |
| सोसायटी, नांदेड | क्रिडा संकुल समिती नांदेड | पालिका नांदेड |

साक्षीदार:-

१. श्री.राम ल.गगराणी
उपविभागीय अधिकारी
तथा अध्यक्ष तालुका क्रिडा संकुल समिती.नांदेड.

२. श्री.गुरदिपसिंघ संधू
प्र.तालुका क्रिडा अधिकारी ,सिडको नांदेड.

Indira Gandhi (Sr.) College
Principal
CIDCO, New Nanded. (M.S.)

Scanned with Oken Scanner